"ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित

# पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगांव.

दिनांक: ३१/१२/२०२०

## सिनिअर व पी.जी. राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व ज्युनिअर, सिनिअर व पी.जी. एस.सी.,एस.टी.,ओ.बी.सी.,एस.बी.सी. व व्ही.जे.एन.टी.

## शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना २०२०-२१

**http://mahadbtmahait.gov.in**

महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ई.बी.सी., एस.सी., एस.टी., ओबीसी., एसबीसी. व व्हीजेएनटी या प्रवर्गामधील भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरण्याकरिता वेबसाईट चालु झालेली आहे. तरी ई.बी.सी., एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. व व्ही.जे.एन.टी. या प्रवर्गात प्रवेश घेतलेल्या अनुदानित व विनाअनुदानित तुकडीतील सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत. ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क व एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. व व्हीजेएनटी प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे बंधनकारक आहे. जे विद्यार्थी अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची संपूर्ण फी भरले नंतर परीक्षा हॉल तिकीट दिले जातील. तसेच शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्जाची प्रिंट व आवश्यक ते सर्व कागदपत्रे जोडून महाविद्यालयात दि.:११/०१/२०२१ नंतर श्री.शेख ए.बी. यांचेकडे जमा करावयाचे आहेत. जे विद्यार्थी दिलेल्या मुदतीत शिष्यवृत्ती अर्ज भरणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची संपूर्ण फी भरावी लागेल.

***मागील वर्षी ई.बी.सी. व शिष्यवृत्ती अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज रिन्युअल करून महाविद्यालयाकडे फॉरवर्ड करणे आवश्यक आहे.***

*खालील सर्व कागदपत्रे **ओरिजनलच P.D.F. किंवा JPEG** मध्ये स्कॅन करून अपलोड करणेचे आहेत.*

*झेरॉक्स किंवा चुकीची कागदपत्रे अपलोड केल्यास शिष्यवृत्ती अर्ज स्विकारले जाणार नाहीत.*

*खालील प्रमाणे कागदपत्रांचा क्रम लावून शिष्यवृत्ती अर्ज जमा करावा.*

१. युजरआयडी व पासवर्ड प्रिंट
२. शिष्यवृत्ती अर्ज (ऑनलाईन भरलेल्या आर्जाची प्रिंट)
३. उत्पन्नाचा दाखला (मा.तहसिलदार यांचा २०१९-२०)
४. डोमेसाईल प्रमाणपत्र झेरॉक्स सत्यप्रत
५. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate) (एस.सी.,एस.टी.,ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांसाठी)
६. आई/ वडील हयात नसलेस त्यांचा मृत्युचा दाखला
७. इयत्ता १० वी पासून विद्यार्थी शिकत असलेल्या मागील वर्षापर्यंतच्या सर्व गुणपत्रिका झेरॉक्स सत्यप्रत (परीक्षा अनेकवेळी दिली असलेस सर्व गुणपत्रक झेरॉक्स)
८. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची प्रवेश पावती
९. आधार कार्ड झेरॉक्स सत्यप्रत
१०. प्रतिज्ञापत्र व रेशन कार्ड झेरॉक्स सत्यप्रत
११. बँकेकडून आधार संलग्न NPCI MAPPING झाल्याचे स्लिप/पोहच पावती
१२. बँक पासबुक झेरॉक्स सत्यप्रत
१३. मागील वर्षी गॅप असलेस गॅप सर्टीफिकेटचे ॲफिडिव्हेट
१४. मागील शाळा /महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत

**शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्यापुर्वी वरील सर्व कागदपत्रे घेऊन महाविद्यालयातुन तपासुन घ्यावीत व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा व पुढील नोटीस आल्यानंतर अर्ज महाविद्यालयाकडे फॉरवर्ड करावेत.**

Scanned with CamScanner

**अपत्यांमध्ये दोनच्या पुढे नंबर असणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑफीसमध्ये माहिती घेऊनच फॉर्म भरणेचे आहेत.**

- ➢ *सर्व कागदपत्रे ऑनलाईन दिसतात याची खात्री करूनच अर्ज महाविद्यालयाकडे पाठवावेत.*
- ➢ *सर्व ओरिजनल कागदपत्रे PDF/JPEG मध्ये स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करावेत.*
- ➢ *विद्यार्थ्यांनी स्वतःचा प्रवेश अनुदानित किंवा विनाअनुदानित मध्ये आहे याची खात्री करून त्या विभागामध्येच अर्ज करावा.*
- ➢ *विद्यार्थ्यांनी स्वतःचा अर्ज स्वतः चेक करूनच महाविद्यालयाकडे ऑनलाईन पाठवावा. जर काही माहिती अपूर्ण असलेस किंवा चुकीची माहिती भरली गेली असलेस अर्जामध्ये दुरूस्ती होत नसल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत अर्ज परत पाठवले जाणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.*
- ➢ *जे विद्यार्थी ऑनलाईन भरलेला अर्ज महाविद्यालयात जमा करणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सवलत मिळणार नाही.*
- ➢ *ऑनलाईन अर्जामध्ये चुकीची व खोटी माहीती भरलेस होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस विद्यार्थी व पालक स्वतः जबाबदार राहतील.*
- ➢ *अपूर्ण अर्ज महाविद्यालयात कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.*
- ➢ *सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्सची सत्यप्रत True Copy किंवा Self Attested करणे आवश्यक आहे.*

१. वरील प्रमाणे **मूळ कादपत्रांच्या सर्व अक्षरे दिसतील असे झेरॉक्स काढून त्या सत्यप्रत (True Copy)/ Self Attested करणे आवश्यक आहे.** वरील प्रमाणे कोणतेही कागपत्रे विद्यार्थ्याकडे उपलब्ध नसेल तर शिष्यवृत्ती अर्ज भरला जाणार नाही.

२. शिष्यवृत्ती अर्ज जमा करतेवेळी आधार कार्ड व बँक खात्याशी लिंक केलेला मोबईल नंबर जवळ असणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्जावर आपला Permanent मोबाईल नंबर देणे गरजेचे आहे. तसेच तो मोबाईल नंबर बँक खात्याशी व आधार कार्डशी संलग्न (Link) केलेला असणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांचा मोबाईल नंबर नियमित चालू असणे गरजेचे आहे. तसेच सदर मोबाईल वर शिष्यवृत्तीचे मेसेजेस येणार असल्यामुळे मोबाईल नंबर बदलू नये. जर काही कारणास्तव विद्यार्थ्याने मोबाईल नंबर बदलला असल्यास व काही आर्थीक नुकसान झालेस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

५. विद्यार्थ्यांनी मागील वर्षाच्या ओरिजनल गुणपत्रकाच्या झेरॉक्स प्रति देणे आवश्यक आहे. (नेट प्रिंट स्विकारली जाणार नाही)

६. विद्यार्थ्याचे बँक खाते **बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया व स्टेट बँक ऑफ इंडियामध्येच चालू स्थितीत** असणे आवश्यक आहे.

७. सर्व विद्यार्थ्यांनी डोमेसिएल देणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थ्यांनी वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे व दिलेल्या सुचनेनुसार सर्व कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. काही कारणास्तव विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज नामंजुर झालेस व विद्यार्थ्यास सुचना देऊनही कार्यालयाशी संपर्क न साधल्यास होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

(डॉ. मिलिंद एम. हुजरे)
**प्राचार्य**
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील
महाविद्यालय, तासगांव (जि. सांगली

Scanned with CamScanner